**derelict,** *adj.* १. टाकलेला, सोडून दिलेला २. कर्तव्यच्युत
*n.* १. टाकलेली वस्तू (स्त्री.) २. (in Maritime Law) सोडून दिलेले जहाज (न.) ३. सोडजमीन (स्त्री.)
**dereliction,** *n.* १. जमीनसोड (स्त्री.) २. (land gained from water by a change of water-line-Chemb.) जलसोड जमीन (स्त्री.) ३. कर्तव्यच्युति (स्त्री.)
**derelict land,** सोड-जमीन (स्त्री.)
**derivative mortgage,** पोटगहाण (न.)
**derive title from,** कडून हक्क प्राप्त करणे [Nego. Instr. Act-s. 9]
**derogate,** *v.i.* न्यूनीकरण करणे, न्यूनता आणणे
**derogation,** *n.* न्यूनता आणणे (न.), न्यूनीकरण (न.)
**derogatory clause,** न्यूनकारी खंड (पु.)
**descend,** *v.t.& i.* १. (to proceed from an ancestor) वंशोद्भव होणे २. (to pass by inheritance) वारसाने प्राप्त होणे
**descendant,** *n.* वंशज (सा.)
**descendible estate,** वंशक्रमगामी संपदा (स्त्री.)
**descending,** *adj.* अवरोही
**descent,** *n.* १. वंश (पु.) २. अवरोही वंशक्रम (पु.) ३. वंशोद्भव (पु.) [Ind. Suc. Act-s. 2(d)]
**description,** *n.* १. प्रकार (पु.) २. वर्णन (न.)
*descriptio personae,* (in Testamentary Law) वर्णित व्यक्ति (स्त्री.)
**desert,** *v.t. & i.* १. (in Matrimonial Law) अभित्याग करणे २. (in Military Law) पळून जाणे, पळून येणे
*n.* १. (merit) पात्रता (स्त्री.) २. (that which is deserved) पात्रतेनुरूप फळ (न.)
**deserter,** *n.* १. अभित्यागी (सा.) २. पळून आलेला (सा.), भगोडा (सा.)
**desertion,** *n.* १. अभित्याग (पु.), अभित्यजन (न.) २. पळून येणे (न.), पलायन (न.)
**design,** *v.t.* १. डाव रचणे, बेत रचणे २. संकल्पचित्रे काढणे, संकल्पन करणे
*n.* १. डाव (पु.), रचलेला बेत (पु.), कारस्थान (न.) २. संकल्पचित्र (न.), संकल्पन (न.)
**designate,** *v.t.* १. निर्देशित करणे, संबोधणे २. पदनिर्देशित करणे ३. नियुक्त करणे, नेमणे
**designation,** *n.* १. निर्देश (पु.) २. पदनाम (न.) ३. नियुक्ति (स्त्री.), नेमणूक (स्त्री.)
*designatio personae,* (in Testamentary Law) निदर्शित व्यक्ति (स्त्री.)
**designedly,** *adv.* १. डाव रचून, बेत रचून २. संकल्पपूर्वक, संकल्पनपूर्वक
**designer,** *n.* १. कारस्थानी (सा.) २. संकल्पचित्रकार (सा.), कल्पक (सा.)
**desirability,** *n.* इष्टता (स्त्री.)
**desirable,** *adj.* इष्ट
**despatch=dispatch,** *v.t.* रवाना करणे, पाठवणे
*n.* १. जावक (स्त्री.) २. उरक (पु.) ३. संदेश (पु.) ४. त्वरा (स्त्री.), शीघ्रता (स्त्री.)
**despatch money,** (money allowed by shipowner when a charterer leads or unloads the goods in less than the time specified) शीघ्रता मूल्य (न.)
**desperate debt,** (hopless debt) बुडीत ऋण (न.)
**destination,** *n.* १. मुक्काम (पु.) [Sale of Goods-Act-s. 51(2)] २. पूर्वोद्दिष्ट (न.)
**destitute,** *adj.* १. अकिंचन २. निराश्रित
**destitute of meaning,** अर्थहीन [Ind. Suc. Act-s. 85]
**destitute or necessitous circumstances,** अकिंचन किंवा निकडीची परिस्थिती (स्त्री.)
**destitute of property,** संपत्तिहीन
**destroy,** *v.t.* नष्ट करणे
**destruction,** *n.* नाश (पु.), नष्ट करणे (न.), नष्ट होणे (न.), नाश पावणे (न.)
**destructive,** *adj.* विनाशक, विघातक
**desuetude,** *n.* (state of disuse) अनुपयोग (पु.), बिनवापर (पु.)
**detail,** *v.t. & i.* १. तपशीलवार सांगणे २. विशेष निर्देश करणे ३. (to appoint for a particular service) विशेष नेमणूक करणे
**details,** *n.pl.* तपशील (पु.)
**detain,** *v.t.* १. स्थानबद्ध करणे २. अडकवून ठेवणे
**detained,** *adj.* १. स्थानबद्ध केलेला २. अडकवून ठेवलेला
**detainer,** *n.* १. निरोधक (सा.) २. निरोध (पु.)
**detention,** *n.* १. स्थानबद्धता (स्त्री.) २. अडकवून ठेवणे (न.), अडकवणी (स्त्री.)
**detention camp,** स्थानबद्धांची छावणी (स्त्री.)
**detention order,** स्थानबद्धता आदेश (पु.)
**detenu,** *n.* स्थानबद्ध (सा.)
**deter,** *v.t.* (धाक दाखवून) परावृत्त करणे, जरब बसविणे
**deterioration,** *n.* १. ऱ्हास (पु.) २. खराबी (स्त्री.) [Sale of Goods Act-s.40]
**determinable,** *adj.* १. समापनीय २. निर्धार्य
**determinate obligation,** (one which has for its object a certain thing) निश्चितार्थ आबंधन (न.)
**determination,** *n.* १. निर्धारण (न.) २. समापन (न.), समाप्ति (स्त्री.) ३. निर्णीत करणे (न.), निर्णीति (स्त्री.)
**determination of proceeding,** कार्यवाहीची निर्णीति (स्त्री.)
**determination of tenancy,** कूळवहिवाटीचे समापन (न.)
**determinative,** *adj.* निश्चायक
**determine,** *v.t. & i.* १. निर्धारित करणे २. समाप्त करणे, समाप्त होणे ३. निर्णीत करणे ४. निर्धार करणे.
**determine a question,** प्रश्न निर्णीत करणे, प्रश्नाचा निर्णय करणे.
**deterrant punishment,** भयोत्पादक शिक्षा (स्त्री.)
**detinue,** *n.* १. (unlawful detention of personal chattel) अवैध निरोध (पु.) २. (the writ used for the recovery of a personal chattel) निरोध लेख (पु.)
**detract,** *v.t. & i.* १. काढून घेणे २. कमी करणे, कमी होणे ३. मानहानी करणे
**detriment,** *n.* १. अपाय (पु.), हानि (स्त्री.) २. अहित (न.)
**detrimental,** *adj.* १. अपायकारक २. अहितकारक
**devaluation,** *n.* अवमूल्यन (न.)
**devastation,** *n.* (waste of goods of the deceased by an executor or administrator, rendering him liable) धूळधाण (स्त्री.) [Ind. Suc. Act-s. 368-m.n.]
**development,** *n.* १. विकास (पु.) २. (धर्माचे) विकसन (न.) [Hin. Mar. Act-s. 2(1)(a)]